महाराष्ट्र शासन
वन विभाग

# वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली यांचे कार्यालय.

वन प्रशासकिय भवन, पोटेगाव रोड, गडचिरोली (महाराष्ट्र)
दुरध्वनी क्रमांक- 07132-233184 फॅक्स क्रमांक & 07132-233187 Email- ccfgad@gmail.com

क्रमांक:- कक्ष -2(8)/जमीन/प्र.क्र. 318/2023/ 1399 गडचिरोली, दिनांक:- 19 .01.2023

प्रति,

मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
व केंद्रस्थ अधिकारी, म. रा., नागपूर

विषय:- **व.स.अ. 1980 अंतर्गत प्रस्ताव वनजमीन 19.50 हे.**
मौजा अहेरी (प्राणहिता) पोलीस उपमुख्यालय करीता कायमस्वरुपी बांधकाम बाबतचा प्रस्ताव.

संदर्भ:- 1) आपले कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-17/नोडल/गडचिरोली/आयडी-2776/914 दिनांक 13.07.2022.
2) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-2(8)/जमीन/प्र.क्र.318/2023/2063,दिनांक 02.09.2022
3) पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे पत्र क्र. पोअग/पोशा/सिबी-2(अ)/203(23)/माहीती/2023/289 दिनांक 11.01.2023, प्राप्त दिनांक 18.01.2023.

---ooo---

वन (संवर्धन) अधिनियम-1980 अंतर्गत पोलीस उपमुख्यालय अहेरी ता. अहेरी, जि. गडचिरोली येथे 19.50 हे. वनजमीन वळतीकरणाचे प्रस्ताव प्रकरणात आपले कडील संदर्भिय पत्रान्वये प्रकल्प यंत्रणेस 19.50 हे. वनजमीनीची आवश्यकता आहे काय? याबाबत प्रकल्प यंत्रणेकडून त्यांचे अभिप्रायसह अहवाल सादर करणे बाबत सुचना आहे.

यानुषंगाने या कार्यालयाकडील संदर्भिय पत्रान्वये पोलीस अधिक्षक,गडचिरोली यांना विचारणा करण्यात आले असता, त्यांनी त्यांचेकडील संदर्भिय पत्र क्र. 3 प्रमाणे अहवाल सादर केलेला, असून सदर अहवालामध्ये नमुद केले आहे की,सदर प्रस्तावातील 19.50 हे. क्षेत्राबाबत आराखडा तयार केला असून पोलीस मुख्यालय अहेरी (प्राणहिता) जिल्ह्याचे दक्षिण भाग आहे. भामरागड, हेडरी, एटापल्ली, अहेरी, सिरोंचा, जिमलगट्टा हे 6 उपविभाग व पोलीस स्टेशन, एटापल्ली, अहेरी, मुलचेरा, आष्टी, भामरागड, सिरोंचा, असरअल्ली, असे 7 पोलीस स्टेशन, व जिमलगटा, रेंगुठा, बामणी, झिंगानूर, कसनसूर, लाहेरी, व्येंकटापूर, राजाराम खां, दामरंचा, रेपनपल्ली, देचलीपेठा, पेरमिली, हे 12 उपपोलीस स्टेशन तसेच पातागुडम, कोटमी, हालेवारा, बोलेपल्ली, ताडगांव, कोठी, नारगुंठा, धोडराज, येलचिल, मरपल्ली, गट्टा, हेंडरी, येमली बुर्गी, आलदंडी, सुरजागड, असे 16 पोलीस मदत केंद्र अतिसंवेदनशिल भागात येत असून नक्षलविरोधी अभियानाकरीता तैनात जवानांना पायाभूत सविधा व त्यांच्या परिवाराला सुरक्षा पुरविण्याच्या दृष्टीने 300 निवासस्थाने बांधकाम करण्यात येणार आहे, तसेच वाढत्या नक्षल कार्यवाहीच्या दृष्टीने भविष्यात पोलीस मुख्यालय अहेरी, अंतर्गत 10 नविन पोलीस मदत केंद्र स्थापन करणे व नविन पोलीस पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे 19.50 हे. क्षेत्रात बाबनिहाय आराखडा नुसार अत्यंत आवश्यकता असल्याचे कळविले आहे. पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचेकडील प्रस्तूत अहवालाची प्रत यासोबत सादर करण्यात येत आहे.

तरी, पोलीस विभागाकडून प्राप्त झालेल्या अहवालानूसार मौजा अहेरी (प्राणहिता) पोलीस उपमुख्यालय करीता प्रस्तावित असलेले 19.50 हे. वनजमीन वळतीकरणाचे प्रस्ताव प्रकरणात मान्यता मिळणेबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात यावी हि विनंती. .

सहपत्र:- वरीलप्रमाणे

( डॉ. किशोर एस. मानकर )
वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली.

प्रतिलीपी:- उपवनसंरक्षक (प्रा.),आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांना माहितीस अग्रेषित.
प्रतिलीपी:- पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांना माहिती अग्रेषित.

o/c